म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. ५२

REFBK-0019158

# आज हिंदुस्थानांत आणि जगांत
# इतिहासाची घडण चालू आहे

✦ आजच्या चालू इतिहासांतील ताज्या घडामोडींचें चित्रण करून त्यांचें पटदर्शन भारतांतील करोडों चित्रपटरसिकांना घडवून द्यायची कामगिरी **इंडियन मूव्हीटोन न्यूज** ही संस्था अभिमानानें बजावीत आहे.

✦ **वार्तापटाचें राष्ट्रीय महत्व** आजच्या काळांत विशेष आहे. कारण राष्ट्रांतील ताज्या घडामोडींचें सत्यचित्रण या वृत्तपटांतून केलेलें असतें.

✦ **राष्ट्रीय वार्तापट** तयार करायची योजना यावेळीं प्रथमच अमलांत येत आहे. पुरोगामी, सुसंस्कृत राष्ट्रांच्या वृत्तप्रसार कार्यांत वार्तापटांकडे फार महत्वाची कामगिरी आलेली आहे. आपल्या देशांतील निरक्षरता निवारणाची तांतडीची गरज लक्षांत घेतां अशा **वार्तापटांचें शैक्षणिक महत्व** आपल्याला विशेषत्वानें जाणवलें पाहिजे.

✦ **इंडियन मुव्हीटोन न्यूजला तुमची मदत पाहिजे.** आमच्या वार्तापटांतील निरनिराळे विषय तुम्हाला कसे काय आवडतात या बद्दल तुमचीं मतें आम्हाला जरूर कळवा. तुमच्या सूचना कळवा. **राष्ट्राच्या इतिहासांत महत्वाचें काम करणारी ही नवी योजना** यशस्वी करायचे कामीं मदत करा.

Acc. No. १९९८(
 ... १९३३

# चिनी गनिमांची आई

तारीख ८ जुलै १९३७. मार्को पोलो पूल* "प्रकरणा" नंतरचा दुसरा दिवस. या दिवशीं एक म्हातारी मांच्युरियन आई पीपिंग शहरांत बाजार करायला गेली. टेंगणी टुसकी, आडव्या हाडांची श्यामलवर्णी बुढ्ढी. तिनं आपले तुरळक केस इतके चापून चोपून उलटे फिरविलेले होते कीं पातळ बटांमधून तिचं टक्कल चकाकत होतं. डोळे काळेभोर. जिवणी चौरस. ही बुढ्ढी दुकानदाराशी जोरांत घासाघीस करीत होती. ती येवढ्या मोठ्यानं बोलत होती कीं तोच बिचारा लाजला अन् कोणी ऐकतंय का काय हें सावचीतपणें

---

* मार्को पोलो पूल "प्रकरण" : मार्को पोलो या प्रख्यात इटालिअन प्रवाशाचें नाव असलेला हा पूल उत्तर चीनमध्यें पीपिंग ( पेकिंग ) शहराजवळ असून ता. ७ जुलै १९३७ रोजीं जपानी लष्करशाहीनें खोटा बहाणा करून याच पुलाजवळ चिनी फौजेवर हल्ला चढविला. लुटूपुटीच्या हालचालींत आपला एक सैनिक हरवल्याचें निमित्त करून जपान्यांनीं पुलालगतच्या वान्पिंग या गावांतील प्रत्येक घराची झडती घेण्याची मागणी केली. गांवांतल्या चिनी शिबंदीनें ही मागणी धुडकावून लावली. त्याबरोबर झटापट सुरू झाली. जपान्यांनीं पांच तासपर्यंत गांवावर तोफा डागल्या व मार्को पोलो पूल ताब्यांत घेण्यासाठी चाल केली. तोफांच्या मारागिरीमुळें वान्पिंगचे २०० लोक ठार झाले तरी चिनी फौजेनें पुलाचा कब्जा कांही सोडला नाही. पुढें उत्तरचीनच्या देशद्रोही प्रांतिक सरकारनें जपान्यांपुढें माघार घेतली. पण सेनापति चियांग कै शेकच्या मध्यवर्ती सरकारनें जपानला शरण जायचें साफ नाकारून जपान-विरोधी युद्धाला जोरानें प्रारंभ केला. मार्कोपोलो पूल प्रकरण हें चिनी-जपानी युद्धाचें तात्कालिक निमित्त ठरलें.

पाहायसाठीं खालीं मान घालून आजूबाजूला हेरूं लागला. शेवटीं बुड्डीनं नोटांचं एक बंडल गल्लेवाल्याजवळ दिलं. त्याच्या मोबदल्यांत तिला कागदांत गुंडाळलेले बरेचसे जडजड जिन्नस मिळाले. ते तिनं आपल्या टोपलींत काळजीपूर्वक भरले.

बुड्डी आपल्या भरल्या घरीं परत आली. सत्तर वर्षं वयाचा वृद्ध पति, दोन मुलगे, दोन मुली व या मुलांचे पांच तरुण मित्र येवढीं माणसं तिच्या घरांत होतीं. बुड्डी आंत येतांच सगळ्यांनी दारं लावून घेतलीं अन् तिच्या भोवतीं एकच गर्दी केली. तिनं टोपलींतून एकेक जिन्नस काढला व त्यावरील कागदाचं वेष्टण काढून पलंगावर हारीनें लावून ठेवला. तीं होतीं कोरीं करकरीत उत्तमपैकीं वंगण घातलेलीं पिस्तुलं—आठ मॉसर व दोन ब्राउनिंग.

या घरचीं हीं माणसं अन् यांचा हा छोटासा शिलेखाना म्हणजे पुढच्या एका वर्षांत १०,००० रायफलींइतकं शस्त्रबळ वाढलेल्या गनिमी पलटणीचा केवळ प्रारंभ होता. या बुड्डीचा सर्वांत वडील मुलगा चाओ तुंग हा या पलटणीचा भावी सेनापति. गेलीं सहा वर्षं त्यानं मांचुरियांतील गनिमी युद्धाचं पुढारीपण चालविलेलं होतंच. बाकीचे तरुण हे त्याचे सहकारी. तेहि मांच्युरियन गनीम. बुड्डी आई ही स्वतः या "पलटणीची" तात्पुरती युद्ध-साहित्याधिकारी, खरेदीखात्याची प्रमुख व पुरवठामंत्री होती. (सहा तगड्या जवानांना भाताचीं लोटकींच्या लोटकीं शिजवून घालायचीं म्हणजे काय मस्करी आहे?) ही बुड्डी पुढें "चिनी गनिमांची आई" मादाम चाऊ म्हणून सर्व चीनभर व जगभर प्रख्यात झाली.

गनिमी तुकडीची संघटना करायला व हत्यारं घ्यायला पैसा लागायचा तो अनेक मार्गांनीं मिळे. त्सिंगटौ नगरसभेचा मेयर ॲडमिरल शेन हुंग-लियेह यानं थोडी मदत केली. एका काळीं मांच्युरियांतील जपान्यांच्या कुशींत कांट्यासारखा रुपत असलेला व आतां अंतर्मोंगोलियांत प्रचंड गनिमी घोडदळ उभारीत असलेला जनरल मा चान-शान याचाहि या संघटनेला पाठिंबा होता. मांच्युरियांतून परागंदा होऊन पीपिंग (पेकिंग)

शहरीं येऊन राहिलेल्या व "ईशान्य प्रांतीय राष्ट्रस्वातंत्र्य संघ" या संस्थेंत संघटित झालेल्या लोकांकडूनहि या कार्याला मदत मिळे. या लोकांची मूळची मायभूमि मांच्युरिया ही जपान्यांनीं बळकावलेली होती. आतां उत्तर चीन ही त्यांची दुसरी मायभूमीसुद्धां जपान्यांनीं बळकावायला सुरुवात केली. अर्थात आक्रमकांचा प्रतिकार करायच्या लढ्यांत मांच्युरियन लोकांनीं पुढाकार घेतला यांत नवल कसलं ?

ते सहा जवान, ती बुड्ढी व संघाचा एक प्रतिनिधि यांनीं आपसांत वाटाघाट चालविली. ही हत्यारं ताबडतोब शहराबाहेर पाठवून देणं आवश्यक होतं. शत्रूनं पीपिंगला वेढा दिला अगर पीपिंग सर केलं कीं सगळाच कारभार संपायचा !

या घटकेला सुद्धां प्रसंग जरा कठीणच होता. शहरांत लष्करी कायदा जारी झालेला. भोंवतालच्या पुरातन तटबंदींतील प्रत्येक वेशीवर २९ व्या पलटणीनं कडक पाहारा बसविलेला. मुलकी इसम हत्यारांनिशीं सांपडले म्हणजे कंबक्तीच. या प्रश्नाचा खूप खल झाला. पीपिंग शहराबाहेरच्या विद्यापीठाकडे जाणाऱ्या मोटार बसेस झडत्या न घेतां जाऊं दिल्या जात होत्या. दोघां जवानांनीं या मार्गानं पिस्तुलं नेलीं. इकडे बुड्ढी चाऊ माई व तिच्या दोघी मुली रिक्शांत बसून पश्चिम दरवाजांतून शहराबाहेर सटकल्या. सैन्यांनीं त्यांना हटकलं तेव्हां बुड्ढीनं त्यांना शेलक्या शब्दांत जो दम दिलाय : "तुम्हाला काय दुसरा उद्योग नाहीं का रे? मला बुड्ढीला व माझ्या तरण्या पोरींना त्रास देतां होय ?" या सरबत्तीमुळं झडती न घेतांच सैन्यांनीं रिक्शा जाऊं दिल्या. बुड्ढीनं आपल्या कमरेला दोन पिस्तुलं लटकावून त्यांच्यावर घट्ट पट्टा कसला होता. दोघी मुलींजवळ प्रत्येकी दोन दोन पिस्तुलं होतीं. बुड्ढीनं आपल्या रिक्शांतून हजार काडतुसं भरलेली एक पेटी पण नेली; तिनं ती सीटखालीं ठेवून दिली होती.

हीं सगळीं हत्यारं शहरापासून आठ मैलांवर त्सिंगहुवा विद्यापीठांत एकत्र करण्यांत आलीं.

त्या सुरुवातीच्या काळांत प्रत्येक तपशील अतिशय काळजीपूर्वक ठरवावा लागे. कमालीचं प्रसंगावधान व निर्धार ठेवावा लागे. ता. २० जुलै रोजीं या तुकडीनं पीपिंग सोडलं. तिचं संख्याबळ म्हणजे सहा हत्यारबंद जवान. सहा बिनलष्करी जवानांनीं पिस्तुलं बरोबर घेऊन खेडोपाडीं हिंडायचं म्हणजे धोकाच. जपान्यांनीं अटक करून झडती घेतली तर नक्कीच गोळ्या खाव्या लागायच्या. चिनी लष्कराच्या हातीं सांपडलें तर जपान्यांचे भाडोत्री गुंड म्हणून नाहक फांशीं जावं लागायचं. पीपिंग शहरांत व आसपासच्या प्रदेशांत गडबड माजवायसाठीं जपान्यांनीं आपले शेंकडों साध्या कपड्यांतले हस्तक पेरून ठेवलेच होते. खेड्यांतल्या संत्र्यांनीं पकडलं तर ते आपलीं पिस्तुलं काढून घेणार; कारण एक तर ते आम्हांला पेंढारी तरी समजणार, नाहींतर आमचीं हत्यारं तरी उपयोगी आहेत म्हणून ते तीं काढून घेणार. दहातीस वर्षांच्या यादवीमुळं चिनी शेतकऱ्याला संकटकाळीं बंदुकीचं मोल कळूं लागलेलं होतं. तो निःशस्त्र असला कीं पेंढारी टोळ्यांनीं व युद्धदेवांच्या नादान फौजांनीं त्याला लुटायचं. माघार घेणाऱ्या फौजा त्याच्या खेड्यावरून गेल्या कीं त्याचा घोडा, त्याचा खटारा, त्याचं धान्यधुन्य, सगळं लुटलं जायचं. थोड्या जरी रायफली असल्या तरी त्यांच्या जोरावर त्याला या वादळाच्या उपसर्गांतून अलिप्त राहतां येई; म्हणजे जिकडं संरक्षणाची सोय कमी असेल तिकडं हें वादळ झुकायचं.

म्हणून या गटानं एक नवाच बहाणा केला. हे सहा जवान भूगर्भशास्त्राचे अभ्यासक विद्यार्थी झाले व संशोधनार्थ डोंगरांत निघाले. त्यासाठीं लागणारे पोशाख, नकाशे वगैरे सर्व साधनं त्यांनीं बरोबर घेतलीं. परिस्थिति अनिश्चित. रानावनांत फालतू लोक उपद्रव देत हिंडत असायचे. त्यांचा प्रतिकार करायला पिस्तुलं हवींतच.

त्यांनीं पीपिंगजवळील तायांगचेंग हें खेडं गांठलं. तिथल्या पाटलाशीं त्यांनीं अगोदरपासूनच संधान बांधून ठेवलेलं होतं. या पाटलानं त्यांना आठ रायफली दिल्या. पीपिंगहून सोळा कॉम्रेड्स त्यांना येऊन मिळाले.

त्यांतले बारा होते मांच्युरियांतले माजी गनीम व चौघे होते वायव्य प्रांतीय विद्यापीठांतले विद्यार्थी. आणखी दोन शेतकरी त्यांना सामील झाले. मिळून झाले चोवीस. येवढ्यांची दहा पिस्तुलं नि आठ रायफली.

आसपासच्या खेड्यांतले लोक आपल्याजवळची एकहि रायफल देईनात; ना देशासाठीं ना पैशासाठीं. सहाजणांजवळ हत्यारं नाहींत. तीं मिळवायचा एकच मार्ग—तो म्हणजे शत्रूजवळून हत्यारं जिंकायचा. म्हणून या तुकडीनं आपल्या जन्माच्या दुसऱ्याच दिवशीं चिनी गनिमांच्या पुरातन पुरवठा—खात्याकडून हत्यारं मिळविलीं. कशीं ? त्यांना असं कळलं कीं, तिथून सहा मैलांवर पूर्व होपे प्रांतांतल्या देशद्रोही सरकारनं आपल्या "शांततासंरक्षक दलापैकीं" वीस सैनिकांची एक तुकडी जपानी अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालीं ठेवली आहे. आमच्या गनिमांनीं त्यांचीं हत्यारं काढून घ्यायचं ठरवलं. पण हे जेव्हां प्रत्यक्ष त्या ठाण्यावर गेले तेव्हां तिथं यांना अवघे तीनच शेंदाड शिपाई सांपडले. बिचारे घाबरून गर्भगळीत झालेले होते. त्यांनीं आपल्या बंदुका ताबडतोब त्यांच्या हवालीं केल्या. ही या गनिमांची पहिली "लढाई."

दरम्यान चिनी सरकारनं जपान्यांशीं तहाच्या वाटाघाटी सुरू केल्या. मार्को पोलो पुलाजवळ कित्येक दिवसपर्यंत कसलीच झटापट झाली नाही. खेड्यापाड्यांतली खळबळ देखील ओसरूं लागली. आमच्या तुकडीनं आठवडाभर भटकंती करून जनतासंबंधाचं कार्य करायचा प्रयत्न चालविला. शेतकऱ्यांनीं या गनिमी विद्यार्थ्यांचीं भाषणं ऐकून घेतलीं. जपान विरोधी लढ्याबद्दल भाषण करणारा हा बहुतांशीं मांच्युरियन लोकांचा चिमुकला सशस्त्र गट त्यांनीं पाहून घेतला. पण जपानी अजून खेडोपाडीं कुठं आले होते ? अन् लढाई तर बंदच होती. शेतकऱ्यांनीं यांना हात राखून सहानुभूति दाखविली. "तहनामा" झाल्यावर जपानी फौज व २९ वी चिनी पलटण या दोहोंनीं मिळून आपल्याला पेंढारी ठरवून रानोमाळ आपली शिकार करीत सुटावं असा प्रसंग शेतकऱ्यांना नको होता. यामुळं

आमच्या गनिमांतले कांहींजण नाउमेद होऊं लागले. कांहींजण घरीं परत जायच्या गोष्टी बोलूं लागले. पण बहुमतानं असं ठरवलं कीं आपण असाच दौरा चालू ठेवायचा. पूर्व होपे प्रांतातल्या देशद्रोही राज्यांत शिरकाव करायचा. तिथल्या लोकांना गुलामगिरीचीं कडू फळं चांगलीच चाखायला मिळालेलीं आहेत. म्हणून ते लोक नक्की उठाव करायला तयार होतील.

युन्‌गान्‌ ( म्हणजे "अक्षय्य शांतता" ) या गांवीं आमच्या या तुकडीचा सपशेल नायनाटच व्हायची वेळ आली. गांवच्या सामान्य लोकांनीं प्रचारकांचं प्रेमानं स्वागत केलं. पण गांवचे प्रतिष्ठित लोक जपान्यांशीं समेट करून राहिले होते. त्यांचा पोटशूळ उठला. त्यांना या तुकडीचं आगमन अशुभसूचक वाटलं. पेंढाऱ्यांची स्वारी व शेतकऱ्यांचं बंड अशांतलाच हा प्रकार आहे असं त्यांनी ठरवलं. या प्रतिष्ठित मंडळींपैकीं एक श्रीयुत चँग हे मादक द्रव्यांच्या कोरियन व्यापाऱ्यांचे एजंट व जपानी गुप्त हेरखात्याचे ऋणानुबंधी होते. या श्रीयुतांनीं जपानी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील देशद्रोही लष्कराच्या नजीकच असलेल्या ठाण्यावर जाऊन खबर दिली कीं "अक्षय्य शांतता" या गांवीं जपान–विरोधी गनिमांच्या तुकडीनं मुक्काम ठोकलाय. ता. २८ जुलै रोजीं हा प्रकार घडला. याच दिवशीं टिन्टसिन शहरीं लढाई चालू होती. नान्‌युआन्‌च्या लढाईच्या आदला दिवस हा.

चाओ-तुंग याच्या मूळ सहा सहकाऱ्यांपैकीं एक वू हसिन्‌-मिन्‌ यानं यानंतर घडलेल्या चकमकीची हकीकत सांगितली ती त्याच्याच शब्दांत देतों:

"पहिल्यांदां आम्ही गांवच्या वेशीवर पाहरा ठेवला होता. पण मग पाऊस पडूं लागला. आम्ही विचार केला, उगाच या कॉम्रेड्सनां पावसांत भिजत कशाला ठेवा ? म्हणून आम्हीं त्यांना आंत बोलावलं. शत्रूशीं आमचा संबंध आलेलाच नव्हता व शत्रूला आम्ही इथं आहोंत हें कळलं असेल याची मुळीं आम्हाला कल्पनाच नव्हती. अन्‌ तो जपानी कुत्ता चँग आमची खबर शत्रूला देऊन राहिला होता हें अर्थातच आम्हाला ठाऊक नव्हतं.

"आम्ही ज्या अंगणांत झोपलें होतों त्याला जपानी व देशद्रोही मिळून पन्नासएक सैनिकांनीं तांबडं फुटायच्या अगोदर गराडा दिला आणि

आमच्यावर हँड ग्रेनेड्सचा वर्षाव चालविला. आमच्यांतले चौघेजण जागच्या जागीं ठार झाले. दोघे जखमी झाले. एकजण बाहेरच्या अंगाला होता तो कैद झाला व तिथल्यातिथं त्याला भोंसकून मारण्यांत आलं.

"तिथून बाहेर पडायला वाटच नव्हती. पण त्या अंगणाच्या एका अंगाला एक खोपट होतं. त्या खोपटाला मागचं दार नव्हतं. आम्हाला वाटलं कीं शत्रूनं खोपटाच्या पिछाडीला कांहीं बंदोबस्त ठेवायची यातायात केलेली नसणार. म्हणून इकडं आमच्यापैकीं कांहींजणांनीं शत्रूशीं गोळागोळी चालू ठेविली व तिकडं बाकीच्यानीं खोपटाची मागची भिंत खालून उकरायचं काम चालविलं. मग सर्वांनीं मिळून त्या खिंडाराला खांदे देऊन भिंत रेटली त्या बरोबर सगळंच्या सगळं खोपट आमच्या अंगावर कोसळलं.

"आम्ही त्या ढिगाऱ्यांतून धडपडत बाहेर पडलों व मागच्या बाजूनं धूम टोकली. जातां जातां गोळीबार चालूच ठेवला. शत्रूपैकीं कांहीजण (हे सगळे चिनी होते ) या बाजूला रेंगाळत होते. त्यांची आम्हाला पाहून सपशेल तारांबळ उडाली अन् आम्हाला अडवायच्या ऐवजीं ते एकमेकावर उगीचच ओरडत इकडे तिकडे धांवत सुटले. त्यांतला एकजण हातवारे करीत "त्यांना जिवंत पकडा! त्यांना जिवंत पकडा!" असं ओरडत सुटला होता. आम्ही निसटून गेलेलों पाहून त्यांना बहुधा मनांतून आनंदच झाला असावा. कांहींही असो, त्यांचा बेत ठरायच्या आधीं आम्ही मात्र वेगवेगळ्या दिशांनीं पळ काढून डोंगर गांठले."

या चोरट्या हल्ल्यांतून निसटायच्या अगोदरच या मंडळींनीं असं ठरवलं होतं कीं सर्वांनीं पांगून राहायचं अन् पीपिंगच्या पश्चिमेला मियाओफेंग शान या "पवित्र डोंगरावर" पुन्हां एकत्र जमायचं. दर मे महिन्यांत या डोंगरावर मोठी यात्रा भरते. युरोपियन व अमेरिकन मुशाफिरांचं हें आवडतं स्थळ आहे. आमचे अठरा गनीम या संकेतस्थळीं पुन्हां जमले. त्यांचा दम उखडलेला होता. ते नाउमेद झालेले होते. त्यांतल्या ज्या सहाजणांचीं घरंदारं जवळपासच होतीं, त्यांनीं ताबडतोब

आपल्या तुकडीला रामराम ठोकून घरचा रस्ता सुधारला. बाकीच्यांनीं हत्यारं पुरून टाकून परत पीपिंगला जायचं का काय करायचं याबद्दल वाद आरंभला. शेवटीं असं ठरलं कीं एकट्या कॉम्रेड चाओ तुंगनंच तेवढं पीपिंगला जावं, तेथील परिस्थिति पाहून घ्यावी, अन् शक्य असल्यास ताबडतोब आणखी हत्यारं व रिक्रूट मिळवावेत. पीपिंगचा पाडाव झालाय हें त्यांना ठाऊकच नव्हतें.

दोन दिवस झाले तरी चाओ-तुंग परत आला नाहीं. त्याच्या शोधार्थ आणखी दोघे गेले. डोंगरांत दडून राहिलेल्या या उरलेल्या नऊ जणांपैकीं तिघे-चौघे मांच्युरियांतले पेंढारी होते. त्यांना आपला लूटमारीचा जुना धंदा पुन्हां सुरू करायची ओढ लागली. नाहीं खायला, नाहीं धड कपडा. एक-दोन वाटसरू व्यापाऱ्यांना लुबाडलं तर काय बिघडलं, असा युक्तिवाद त्यांनीं चालू केला. पण बाकीच्यांनीं (त्यांतले चौघे विद्यार्थी होते) त्यांच्या या धोरणावर भयंकर जोराचा हल्ला चढविला. बाकीच्यांनीं त्यांना बजावलं "तुम्हाला पेंढारी व्हायचं असलं तर तुम्ही आमच्यांतून निघून जा कसे ! पण आम्ही तुम्हाला हत्यारं मात्र नेऊं देणार नाहीं. हीं हत्यारं जपान्यांचा प्रतिकार करायला म्हणून खरीदलेलीं आहेत. लूटमार करायला नव्हेत." या चिमुकल्या तुकडींतला मतभेद वाढतच चालला. युनगान् येथील चोरट्या हल्ल्यामुळं त्यांचा जो धीर खचला त्याचं फार वाईट पर्यवसान होऊं लागलं. सहा गनीम तर घरींच निघून गेले. कांहींना पेंढारीपणा सुचूं लागला. लढाईचा अनुभव नसल्यामुळं व पराभवाची खंत वाटल्यामुळं विद्यार्थ्यांचीं मनं बेचैन झालीं. पोटांत भूक, श्रमाची संवय नसल्यामुळं जीव आंबलेला, असंच भटकण्यांत कांहीं अर्थ आहे का ? पण मनांतल्या या भावना विद्यार्थ्यांनीं बाहेर मात्र मुळींच दर्शविल्या नाहींत.

या बाराजणांच्या चिमुकल्या पलटणीनं युद्ध चालू ठेवावं का आपली वाताहत होऊं द्यावी याचा निर्णय तिच्या ऐवजीं बाहेरच्या परिस्थितीनं लावला. शत्रूच्या हातीं पडलेल्या पीपिंग शहरांत निर्माण झालेल्या परिस्थितीनं

याचा निर्णय लावला. इकडे हे गनीम हत्यारांच्या शोधार्थ दऱ्याखोऱ्यांतून पायपीट करीत होते तेव्हां शहरांतले त्यांचे पाठिराखे कांहीं स्वस्थ नव्हते बसले. मांच्युरियन निर्वासितांच्या जपानविरोधी चळवळीनंच त्यांना प्राथमिक प्रतिकाराची स्फूर्ति दिली होती. अन् आतांहि याच चळवळीनं त्या लक्तऱ्या विद्यार्थ्यांच्या युक्तिवादाला जोराची साथ दिली. निःशस्त्र चिनी लोकांना लुबाडून श्रीमंत व्हायचा मोह दूर सारावा व जपानच्या लष्करी सामर्थ्याशी दोन हात करण्यांतला धोका व अनिश्चितपणा पत्करावा म्हणून हे विद्यार्थी आपल्या धीर खचलेल्या कॉम्रेड्सचीं मनं वळवीत होते. या कामीं मांच्युरियन निर्वासितांच्या चळवळीचीच त्यांना पुन्हां मदत झाली.

चाओ तुंग व त्याच्या शोधार्थ गेलेले दोघे गनीम हे एकदांचे परत आले. त्यांच्या बरोबर बुड्ढी चाऊ माई पण आली. ईशान्य प्रांतीय राष्ट्रीय स्वातंत्र्य संघाचा एक प्रतिनिधीहि आला. त्यांनीं पुष्कळशा वळकट्या बरोबर आणल्या. सर्वांनीं त्या वळकट्या सोडल्या. आंत होत्या तीन मशीन गन्स, वीस रायफली, चार पिस्तुलं, हजार काडतुसं. हें सगळं साहित्य त्यांनीं शहराच्या वेशींतूनच बाहेर आणलं. आतां वेशींवर देशद्रोही लष्कराचा पाहारा होता. बुड्ढी चाऊ माई रिक्शांत मशीनगन्स ठेवून त्यांच्यावरच ऐटींत ठाण मांडून बसलेली होती. तुंगचौ येथील बंडानंतर लगेच हीं हत्यारं हालविण्यांत आली होतीं. त्यावेळीं देशद्रोही लष्कराला जपानी लोक हत्यारं देत नव्हते. दोघां सैन्यांनीं वळकटी तपासायचा प्रयत्न केला. पण चाओ तुंगनं रोखलेल्या पिस्तुलाकडे त्यांचं लक्ष जातांच तपासणी आपोआप बंद झाली.

यानंतर चोवीस तासांच्या अवधींत ईशान्य प्रांतीय विद्यापीठांतले वीस विद्यार्थी शहर सोडून डोंगरांत गेले.

डोंगराच्या उतरणीवर बसून त्यांनीं गोष्टी केल्या. गनीमांनी आपल्या पराक्रमाची व हालअपेष्टांची हकीकत सांगितली. चाऊ माईनं आपली हकीकत सांगितली. तिनं जीं हत्यारं खरीदलीं त्यांसाठीं एका प्रमुख मांच्युरियन नागरिकानं २००० डॉलर्स दिले होते व १००० डॉलर्स तिनं लहान लहान

देणग्यांच्या रूपानं जमविले होते. हत्यारांच्या दुकानदाराशीं तिचा करार असा होता कीं थोडी रक्कम अगाऊ द्यायची. त्या दुकानदाराला बुढ्या बायांची गिऱ्हाइकी क्वचितच मिळे. त्याला वाटलं या बावळट शेतकरी बुढ्ढीला बन-वावं व पैसे उकळावेत; तिला थोडंसं घाबरवलं कीं झालं; मग तिला हत्यारं न्यायची आटवण होतेच कशाला ? असा विचार करून त्यानं तिला दुकानांतच एका बाजूला बोलावून घेऊन दम द्यायच्या स्वरांत सांगितलं : 'हें बघ बया, तुझा मुलगा गनीम आहे हें मला ठाऊक आहे. तूं बऱ्या-बोलानं सगळेच पैसे आगाऊ देऊन टाक कसे. नाहींतर मी जपान्यांना सांगेन हं.' यावर बुढ्ढी चाऊ माई खणखणीत जबाब देते: "अरे होय होय ! माझा मुलगा गनीम आहेच आहे. तो सहा वर्षं मांच्युरियांत गनिमी लढा लढतोय. आम्ही मरणाला भिणारे नव्हत, समजलास ! आम्ही जर मरणाला भ्यालों असतों तर हें काम आम्ही केल असतं का रे ? जा जा खुशाल सांग जा जपान्यांना ! त्यांना हें कळलं म्हणजे माझा मुलगा थोडाच त्यांना सांपड-तोय ? पण मला त्यांनीं पकडलं म्हणजे गनीमांना हत्यारं कोण देत होतं हें मी मात्र त्यांना जरूर सांगेन बरं का रे देशद्रोह्या ! अन् मग तूं मात्र त्यांना नेमका सांपडशील !" हें सांगतांना बुढ्ढीनं त्यावेळच्या आवेशाची हुबेहूब नक्कल उठवली व जवळच बसलेल्या गनिमाला दुकानदार कल्पून तिनं त्याच्यावरच ही झोड उडवली. तिच्या त्या नाटकाचा गनिमावर येवढा परि-णाम झालेला दिसला कीं त्या हलकट दुकानदाराऐवजी आपणच हिच्या रागाचे विषय आहोंत असंच जणूं त्याला वाटूं लागलं असावं.

कालपर्यंत अगदीं हताश व दुःखी मनःस्थितींत असलेली ही गनिमांची चिमुकली तुकडी या हकीकती ऐकून मनसोक्त हसूं लागली व या हास्याचा प्रतिध्वनी दऱ्याखोऱ्यांतून घुमून राहिला.

आणखी अनेक अडचणी त्यांच्यापुढं दत्त म्हणून उभ्या राहिल्या. त्या इतक्या सहज निवारण्याजोग्या नव्हत्या. "अक्षय शांततेच्या" गांवीं ठार झालेले चौघे सैनिक हे मांच्युरियांतले माजी गनीम होते. ते मांच्युरियांतून

निर्वासित होऊन बायकामुलांसह पीपिंग शहरीं येऊन राहिले होते. आतां त्याच्या बायका नि आया चाऊ माईकडे रडत रडत आल्या नि म्हणूं लागल्या. "आमचे पोशिंदे गेले. आतां आम्ही काय करावं?" त्यांतल्या एकदोघी दुःखावेगानं व कडवटपणानं असंही म्हणाल्या. "तुझा मुलगा कां गं नाहीं मेला? आम्ही चौघीजणी उघड्या पडलों. आमचेच मुलगे व नवरे तेवढे मरावेत अं?" या मान्याला बुड्ढी कसची तोड देणार? ती बिचारी मुकाट्यानं दुसऱ्या गांवीं निघून गेली. मग मांच्यूरियन कमिटीनं हें प्रकरण आयल्या हातीं घेतलं. कमिटीचे लोक त्या बायांना भेटून सांगू लागले: "तुम्ही उगीच त्या बिचाऱ्या चाऊ माईला घाबरवून पळवून लावलंत. आतां तिचं काम कोण करील? तिच्याप्रमाणं आपला जीव रोज धोक्यांत कोण घालील बरं? तुमच्या पुरुषांचा सूड कोण घेईल?" मग मात्र त्या बायांची समजूत पटली; मांच्यूरियन कमिटीनं जी काय मदत दिली ती त्यांनीं मुकाट्यानं घेतली आणि पुन्हां बुड्ढी चाऊ माई परत येऊन हत्यारखरेदीच्या कामाला लागली.

ही तुकडी डोंगरांत मुक्काम ठोकून राहिली व तिनं हत्यारांच्या शोधार्थ पश्चिम घाटांतून सर्वत्र स्काउट रवाना केले. लष्करांतून कमी केलेले सैनिक व नोकरींतून निघालेले पोलीस खेडोपाडीं भटकत होते. त्यांनी आपल्या रायफली अगदीं थोडक्या मोबदल्यांत मोठ्या आनंदानं यांना विकल्या. त्यांतले कांहीजण या गनिमांना येऊन मिळाले व लोकांनीं शेतांतून व खोपटांतून कुठंकुठं हत्यारं लपवून ठेवलेलीं होतीं त्या जागा त्यांनीं सांगितल्या. आतां या तुकडीला गनिमी लष्कराच्या विशिष्ट रोगाची बाधा होईनाशी झाली–हा रोग म्हणजे हत्यारांना माणसांचं अजीर्ण व्हायचा रोग. आतां या तुकडीत चाळीस लोक होते. त्यांतले बहुतेकजण विद्यार्थीच होते. अन् त्यांच्याजवळ दुप्पट रायफली होत्या.

या तुकडीची सर्वसाधारण सभा भरून तींत तिला "चिनी जनतेची पहिली जपानविरोधी संयुक्त पलटण" हें नांव द्यायचं ठरलं. चाळीस

माणसांच्या मानानं या नांवांत अतिशयोक्तीच होती. पण मांच्युरियांतल्या अनेक गनिमी पलटणींचा प्रारंभ याहीपेक्षां कमी संख्येनं झालेला आहे. सेनापतिपदावर चाओ तुंग याची निवड झाली. त्याच्या हाताखाली सुन मिंग–हाओ, लिन–फू–हसियांग व लिऊ फेंग–वू हे तिघे माजी मांच्युरियन स्वयंसेवक अधिकारी म्हणून देण्यांत आले. विद्यार्थ्यांपैकीं एकालाही अधिकारीपद मिळालं नाहीं. त्या बाबतींत असं ठरलं कीं लष्करी अनुभव नसलेल्या सगळ्या रिक्रुटांनी निदान दोन महिने तरी सामान्य सैनिक म्हणून काम करावं अन् मगच त्यांना अधिकाराची जागा द्यावी.

आतां या तुकडीनं असं ठरवलं कीं पीपिंगच्या जनतेला आपलं अस्तित्व जाणवून द्यायचं. राज्यकर्त्यांनीं दगलबाजीनं शहर शत्रूच्या स्वाधीन केल्यामुळें ही जनता अगदीं हताश झालेली होती; म्हणून हिला थोडा हुरूप आणायसाठीं आगस्ट महिन्याच्या सुरवातीला या तुकडीनं पीपिंगच्या तुरुंगावर छापा घालायचा व्यूह रचला. या तुरुंगांत ६०० कैदी होते. त्यांतले बरेचसे राजबंदी असून ते जपान्यांच्या हातून केव्हां फांशी जातील याचा नेम नव्हता.

तुरुंगावरील हल्ल्यांत भाग घेणाऱ्या एका गनिमानंच ही हकीकत सांगितली. ती त्याच्याच शब्दांत देतों :

"आम्ही रात्रौ तुरुंगाजवळ गेलों. कांहींजण पुढुन गेले नि कांहीजण मागून. त्याचवेळीं आम्ही शहराच्या दोन वेशीवरहि पाहरेकरी ठेवले होते. जपानी लष्कर जर कदाचित् आलंच तर आम्हाला खबर मिळावी म्हणून ही व्यवस्था केली. तुरुंगाच्या मुख्य दरवाजावर छापा घालणाऱ्या तुकडीबरोबर मी होतों.

"आमच्यापैकीं कांहीजणांना जपानी भाषा येत होती. यावरुन आम्हांला एक शक्कल सुचली. आम्ही रस्त्यांतल्या एका पोऱ्याला धरलं. त्याला १० सेंट दिले अन् त्याला सांगितलं कीं, तुरुंगाच्या दिशेनं धांवत जा आणि

'जपानी अधिकारी आले! जपानी अधिकारी आले!' असा ओरडा करीत रहा.

"मग कांहीं मिनिटांनीं आम्हीं आलों आणि आम्हाला जेवढं जपानी येत होतं तेवढंच शक्य तितक्या मोठमोठ्यानं बडबडत राहिलों. तुरुंगाच्या दरवानानं दार उघडतांच आम्हीं त्याच्यावर पिस्तुलं रोखलीं आणि त्याच्याकडून बराकीच्या किल्ल्या हिसकून घेतल्या. तेवढ्यांत आमच्या इतर कांही लोकांनीं टेलिफोनच्या तारा शोधून त्या तोडून टाकल्या. बाकीच्यांनीं पहारेकऱ्यांचीं हत्यारं काढून घेतलीं.

"मग तुरुंगाच्या मधल्या अंगणांत उभा राहून चाओ तुंगनं सर्व कैद्यांना ऐकूं जाईल एवढ्या मोठ्यानं ओरडून सांगितलं. "अरे! आम्हीं जपानी नव्हेंत! आम्हीं तुम्हाला सोडवायला आलों आहोंत! तुमच्या कोठड्यांचे दरवाजे फोडा! आम्हीं पीपिंगच्या डोंगरांतले जपान-विरोधी गनीम आहोंत! गनीम!"

"आम्ही शक्य तितक्या झटपट कोठड्यांची दारं खोलूं लागलों. तोंवर दूरच्या कोठड्यांतील कैद्यांनीं आपल्या बिछान्यांचे दांडे अगर जी जड वस्तु मिळेल ती घेऊन दरवाजे फोडायचा क्रम चालविला होताच. तुरुंगातला हत्यारखाना आम्ही खोलला; त्यांत आम्हाला तीन मशिनगन्स, पस्तीस रायफली, वरींचशीं पिस्तुलं व पुष्कळसा दारुगोळा मिळाला.

"मी एक मशिनगन घेऊन पुढच्या दरवाज्यावर पाहारा करीत होतों. सगळे कैदी मुख्य आवारांत जमा झाले. तिथं चाओ तुंगनं त्यांना उद्देशून भाषण केलं. तो म्हणाला: 'तुम्हीं इतके दिवस तुरुंगांत कुजत पडलां होतां. तुमच्यांपैकीं अनेकांना फांशीं जावं लागलं असतं. आतां तुम्ही चिनी जनतेच्या उपयोगीं पडाल, राष्ट्राच्या शत्रूचा प्रतिकार करा!' त्यांतले जे चांगले कैदी दिसले त्यांना आम्ही तिथल्या पस्तीस रायफली वांटून दिल्या आणि लगेच परत निघालो. जास्त वेळ थांबणं धोक्याचं होतं."

मग हे चाळीस गनीम पुढं आणि ५७० कैदी पाठीमागं अशी ही मिरवणूक शहरांतून बाहेर पडली. किती विचित्र होती ती मिरवणूक ! सर्व कैद्यांच्या अंगावर सफेत बंदी–गणवेष. कांहींच्या पायांत बेड्या तशाच. कांहीजण इतका दीर्घकाळ तुरुंगांत होते कीं त्यांना धड चालतांहि येईना. अनेकजण आजारी. ही विचित्र परेड शहराच्या एका प्रमुख वेशींतून पोलिसाच्या देखरेखीखालीं बाहेर पडली; पण कैद्यांची ही मोठी संख्या पाहून पोलीस घाबरला व धांवाधाव करीत हेडऑफिसला टेलिफोन करायला गेला. तोंवर गनीम व कैदी अंधारांत अदृश्य होऊन डोंगराच्या आश्रयाला गेले सुद्धां.

पीपिंग व टिन्टसीन या शहरीं ही तुरुंग-फोडीची बातमी कर्णोपकर्णीं पसरली. "सगळा ग्रंथ आटोपलेला नाहीं" असा या बातमीचा अर्थ जनतेनं घेतला. शत्रूनं व्यापलेल्या प्रदेशांत अलग अलग रीतीनं जपान-विरोधी प्रतिकाराची तयारी करणाऱ्या लढवय्यांना या बातमीनं उत्तेजनाचा संदेश मिळाला. "तुम्ही एकटे नाहींत. इतरांच्या प्रतिकाराचं दृश्य फळ दिसायला सुद्धां लागलंय", असा तो संदेश होता.

डोंगरांत गेल्यावर या गनिमांनीं एक सभा घेतली. सर्व माजी "राजबंदी" धरून एकंदर तीनशें माजी कैदी गनिमी तुकडींत सामील झाले. या चिमुकल्या लष्कराची अंतर्गत व्यवस्था पुन्हां झपाट्यानं पालटली. पुन्हां हत्यारांचा भयंकर तुटवडा पडला. या तुकडीच्या व्यक्तिगत रचनेंतही फरक झाला. विद्यार्थीमंडळी अल्पसंख्य झाली. आतां या तुकडीचं मनुष्यबळ २५० झालं. रसद, खाद्यपदार्थ, पैसे, इत्यादि सगळेच नवेनवे प्रश्न उभे राहिले.

या गनिमांनीं आपलं ठाणं पीपिंगच्या नजीकच ठेवलं. बुढ्ढी चाऊ माई नेमानं शहरांतून टोपलीभर हत्यारं घेऊन येई. गनिमांच्या "पिछाडीला" शहरांत काय काय व्यवस्था चालली आहे, पैसा जमवायचं काम कसकसं चाललंय, याची माहितीही ती घेऊन येई. ती रोज सकाळीं आपल्या

दारांतच रिक्शांत बसे आणि थेट शहराबाहेर मुलाच्या छावणीवर येई. अजून कुणालाहि तिचा संशय आलेला नव्हता. चाऊ माईच्या अंगावर आतां एक नवं काम पडलं. ती आतां रिक्रूट भरती करूं लागली. विद्यार्थी तिला येऊन भेटत अन् ती त्यांना छावणीकडे पाठवी. हायस्कुलांतून व विद्यापीठांतून दोन दोन व तीन तीन अशा गटांगटांनीं विद्यार्थी येत. यांतल्या कांही विद्यार्थ्यांनी आदल्या वर्षीं शेन्सी प्रांतांतील त्या वेळच्या लाल सेनेनं चालविलेल्या गनिमी लष्करी शाळांतून शिक्षण घेतलेलं होतं.

पीपिंग शहराच्या 'ते शेंग' गेटाजवळ गनिमांची एक चौकी होती. एक जपानी लॉरी त्या चौकीजवळून बिनधोकपणानं जाऊं लागली. चौकींतले पहारेकरी हे बंधमुक्त कैदी होते. त्यांनीं लॉरीवर गोळी चालवून दोघां जपान्यांना ठार केलं. या लॉरीत गनीमांना दोन रायफली, एक पिस्तुल, शेकडों ब्लांकिटं व इतर जिन्नस मिळाले. याबद्दल एक गनीम सांगतो, "आम्ही या सामानांतून आमची लष्करी सिद्धता केली. अन् आम्ही खरोखरीच सैनिकासारखे दिसूं लागलो. पावसाळा आल्यावर उघड्यावर कसं झोपायचं ही आमची चिंता आतां दूर झाली. शहरांतल्या आमच्या मित्रांनी आमच्यासाठी हिंवाळी कपडे घ्यायला म्हणून शेंकडो डॉलर्स फंड जमविला होता, ते पैसे आम्ही वांचविले." यापुढं जपान्यांनी 'ते शेंग' गेट बंद करून त्याच्यावर वाळूचीं पोती रचलीं. मग त्यांनीं शत्रूचा शोध चालविला. आपलं राज्य मानीत नाहीं, आपले तुरुंग फोडतो, आपल्या लॉऱ्यांवर छापे घालतो, असा हा शत्रू आहे तरी कोण याचा त्यांनी तपास चालविला.

आमची गनिमी तुकडी आतां एक महिन्याची झाली. तिचं संख्याबळ जें प्रथम सहा होतं तें आतां ४०० पर्यंत वाढलं. तीनच आठवड्यांपूर्वींची मूटभर अवशिष्ट गनिमांची ही तुकडी आतां पीपिंगच्या पंचक्रोशीतील प्रमुख जपानी-विरोधी शक्ति झाली.

या सुमारास या पलटणीनं आपली दुसरी सर्वसाधारण सभा भरविली व तिनं पलटणीसाठीं मुख्य कचेरी व राजकीय खातं यांची स्थापना केली.

हें राजकीय खातं म्हणजे काय होतं बुवा ? जपान्यांशीं लढायसाठीं म्हणून या गनिमी तुकडींत लोक दाखल झालेले होते; अर्थात काय वाटेल तें झालं तरी सगळा भर या लढाईच्या कार्यावर द्यायचा अशी खबरदारी घेणं आवश्यक होतं. ही कामगिरी ह्या राजकीय खात्याकडे आली. या तुकडीच्या अल्पशा कारकीर्दींत तिच्यांत अनेक आश्चर्यकारक अंतर्गत उलथापालथी झाल्या तरी ती आपल्या ध्येयांत कधींही फरक होऊं देणार नाहीं अशी हमी या राजकीय खात्यानं घेतली. या खात्यांत मुख्यतः विद्यार्थ्यांचाच भरणा होता व त्याचं नेतृत्व ईशान्य प्रांतीय विद्यापीठाचा पदवीधर कॉम्रेड काओ पेंग याच्याकडे होतं. युद्धापूर्वी तो जपान्याच्या जुलुमानं गांजलेल्या मांच्युरिया प्रांतांत अखिल चिनी राष्ट्रीय स्वातंत्र्य संघाचा गुप्त प्रतिनिधी म्हणून कार्य करीत होता.

या राजकीय खात्यानं आपल्या कामगिरीला सुरवात अशी केली : कॉम्रेड काओ पेंग यानं आपल्या तुकडीतील चाळीस विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या गटांत विभागलं. विद्यार्थ्यांनी सामान्य गनिमांची रहाणी पत्करली. व पूर्वी सैनिक शेतकरी अगर पेंढारी असलेल्या या गनिमांशी व्यक्तिशः जिवाभावाची दोस्ती संपादून केली. त्यांनी त्यांना आपल्या आयुष्यांतल्या अनुभवांचे दाखले देऊन जपान्यांचा प्रतिकार करणं कसं आवश्यक आहे हें समजावून सांगितलं. कित्येक गनीम जे या तुकडीत सामील झाले होते त्यांनी तुकडीच्या ध्येयाबद्दल अगदीच मोघम कल्पना करून घेतलेल्या होत्या, अशा लोकांची दिशाभूल करायची, तुकडीवर हुकूमत गाजवायची व मग या अधिकाराच्या जोरावर पेंढारीपणा करायचा अथवा वैयक्तिक महात्म्य वाढवून घ्यायचं असं करायला एखाद्या पुढाऱ्याला चांगलाच वाव मिळण्याजोगा होता. असल्या कसल्याही खटपटी करणाऱ्यांना राष्ट्रद्रोही मानलं पाहिजे अशी शिकवण राजकीय शाखेच्या कार्यकर्त्यांनीं गनिमांना दिली. एक जपानविरोधी सशस्त्र संघटना मोडून टाकणं ही गोष्ट वैयक्तिक स्वरूपाची नव्हे. असलं कृत्य म्हणजे राष्ट्रीय प्रतिकाराच्या पाठींत सुरा खुपसणं होय. शत्रूचा प्रत्यक्ष फायदा करून देणारं कृत्य होय.

गनिमी पलटण ही केवळ जनतेचीच पलटण असूं शकते. जनतेच्या विश्वासाअभावीं ही पलटण आपल्या विशिष्ट भूमिकेच्या सर्व सोईंना पारखी होते. अशा विश्वासाअभावीं ही पलटण म्हणजे घरादारांना पारखे झालेल्या उडाणटप्पूंचा एक कंपू ठरते व ती प्रत्येक माणसाचं वैर संपादन करते. म्हणून कॉम्रेड चाओ तुंगच्या तुकडीला जनतेचा विश्वास संपादन करून देणं हें राजकीय खात्याचं आणखी एक कार्य होतं. यासाठीं पहिली गोष्ट म्हणजे गनिमांची अंतर्गत शिस्त जास्त कडक करणं ही होती. पैसे दिल्याशिवाय लोकांकडून कांहीएक घ्यायचं नाहीं; शेतकरी, त्यांचीं घरंदारं, त्यांचीं शेतंभातं या सगळ्यांचा संभाळ करायचा. म्हणून राजकीय शाखेनं असा एक स्लोगनच दिला होता कीं " ही गनिमी पलटण म्हणजे लाओ पाई हसिंग* याचीच (सामान्य जनांचीच ) पलटण आहे. " दरेक गांवीं विद्यार्थ्यांनीं खेडुतांच्या सभा घेतल्या व भाषणं केलीं; त्यांच्यावर सहकार्याची सक्ती करण्याऐवजीं त्यांच्या सहकार्याची त्यांनी याचना केली.

शेवटीं हें "राजकीय कार्य शत्रूच्या गोटांत देखील" चालू करण्यांत आलं. आरंभीं आरंभीं या गनिमांना प्रत्यक्ष जपानी सैनिकांशीं लढण्याचा प्रसंग क्वचितच येई; बहुधा त्यांना जपानी अधिकाऱ्यांच्या हाताखालील देशद्रोही सैनिकांशींच लढावं लागे. हें देशद्रोही लष्कर चालून आलं कीं आमचे गनीम आधीं त्याला मोठमोठ्यानं ओरडून सांगायचे :

"अरे, तुमच्या बंदुका तुम्हीं आपणां सर्वांच्या खऱ्या शत्रूवर कां नाहीं रोखीत ? "

"अरे, चिनी लोकांनीं चिनी लोकांशीं लढूं नये ! "

" अरे, आपलीं गेलेलीं घरंदारं लढून परत मिळवूं या ! "

---

* लाओ पाई हसिंग म्हणजे शंभर प्राचीन नांवें. चीनमध्यें हा शब्द-प्रयोग सामान्य जनतेचा निदर्शक म्हणून सर्रास वापरण्यांत येतो. परंपरेनें चालत आलेलीं फक्त शंभर आडनांवे चीनमध्यें रूढ आहेत. म्हणून " शंभर नांवें " म्हणजेच अखिल चिनी जनता, असा अर्थ घ्यायचा.

हा ओरडा करून त्याच्या जोडीला चार दोन गोळीबाराच्या फैरी झाडल्या कीं, तेवढ्यावरच ही देशद्रोही सेना हत्यारं टाकून ढुंगणाला पाय लावून पळ काढीत सुटे किंवा सरळ गनिमांना येऊन मिळे. या देशद्रोही सैनिकांना आपल्या धन्याची चाकरी मनापासून मुळींच आवडत नव्हती.

बुद्धी चाऊमाई ही पीपिंग शहरांतच होती. तिच्याकडून एक अशुभ वर्तमान आलं. आमची तुकडी व तिचे शहरांतील पाठिराखे यांच्याबद्दल देशद्रोह्यांनीं जपान्यांना माहिती दिली. ती काय काम करते याबद्दल सुद्धां जपान्यांना खबर मिळाली. म्हणून तिनं थोड्याच दिवसांत पीपिंगहून सुरक्षितपणानं पोबारा केला अन् लांबच्या वाटेनं ती चीनच्या मध्यप्रांतांत गेली.

जपान्यांनीं चाओ तुंगला पकडण्यासाठीं काओ–हसिएन–चांग या देशद्रोही कुत्र्याची योजना केली. उत्तर चीनमधील लोकांना काओ बद्दल भयंकर चीड होती. तो एका पेंढारी दलाचा प्रमुख व जपान्यांचा कुप्रसिद्ध हस्तक होता. त्यानं मांच्युरियन स्वातंत्र्यवादी सेवादलाचा पुढारी ली--हाइ--चिंग याला " शत्रूविरुद्ध एकजुटीचा ठराव करायच्या वाटाघाटींसाठीं " म्हणून बोलावलं अन् दगलबाजीनं ठार केलं. जपान्यांकडून ५०००० डॉलर्स बक्षीस मिळविण्यासाठीं त्यानं हें नीच देशद्रोही कृत्य केलं. आतां जपान्यांनीं चाओ तुंग व आमची गनिमी तुकडी यांचा नायनाट करण्यासाठीं काओला १००,००० डॉलर्सचं आमिष दाखविलं. काओ-नं ली च्या बाबतींत जो डाव केला तसाच डाव चाओ च्या बाबतींत रचला. पण यावेळेला चाओ ला बोलावणं करायच्या ऐवजीं काओ स्वतः आपण होऊन चाओ च्या " भेटीला " गेला व बरोबर ३५० सशस्त्र पेंढारी घेऊन आला. चाओ तुंगच्या तुकडीला काओ चा हा डाव अगोदरच कळलेला होता. म्हणून या गनिमांनीं प्रथम काओच्या देशद्रोही लष्कराला अशा अडचणींतून यायला लावलं कीं या लष्कराचे दोन तुकडे झाले अन् दोन्ही तुकड्यांवर वेगवेगळे छापे घालून गनिमांनीं सर्व पेंढाऱ्यांचीं हत्यारं काढून घेतलीं. स्वतः काओ हा चाओ तुंगच्या झोंपडींत आपलं स्वागत होईल या

आशेनं वाट पाहात बसला होता, अन् तिथल्या तिथंच तो कैद झाला. या छोट्या चकमकींत गनीमांचे अवघे तीन इसम ठार झाले व एक जखमी झाला; मात्र इतक्या अल्प नुकसानींत या जपानविरोधी गनिमांना २०० रायफली मिळाल्या. मग निःशस्त्र पेंढाऱ्यांना सोडून देण्यांत आलं. व काओ-हसिएन–चांगवर मात्र लष्करी कोर्टांत खटला भरून त्याला गोळी घालून ठार करण्यांत आलं.

कांहीं दिवसांनीं एका जपानी टेहळ्या विमानानं आमच्या गनिमी तुकडीचा ठावठिकाणा पश्चिम घाटांतील तिएन् मेन् चू या गांवीं लावला. त्यांच्यावर मशिनगनचा मारा करायच्या हेतूनं हें विमान डोंगराकडेनं खालपट उड्डाण करूं लागलं. सुदैवानं गनिमांच्या नेमबाजीनं विमान खालीं आणलं. आमच्या गनिमी तुकडीला हत्यारं व दोन महिन्यांची रसद पुरवायला तिच्या पाठिराख्यांना जो खर्च आला त्याच्या दसपट खर्च तें एक विमान तयार करण्यापायीं जपानी तिजोरींतून झाला होता.

अशा प्रकारच्या घटना व ऑगस्ट–सप्टेंबरांत पीपिंग शहराभोंवतीं अनेक गनिमी तुकड्यांचा सुळसुळाट झालेला पाहून जपान्यांनीं या गनि-मांचा नायनाट करण्यासाठीं एक लष्करी मोहिमच काढली. आक्टोबरच्या सुरवातीला त्यांनीं तीन ब्रिगेड्स लष्कर, विमानं, चिलखती मोटारी, टँक्स, इत्यादी सर्व साधनांनीं सज्ज करून पश्चिम घाटांत मोहिमेवर पाठविलं. त्याच्या उलट मार्को पोलो पुलावरील झटापटीच्या अगोदर जपान्यांनीं अवघा उत्तर चीन फक्त एका ब्रिगेडच्या जोरावर आपल्या ताब्यांत ठेवला होता. टांगकू व पीपिंग या शहरीं चिनी देशद्रोह्यांकडून शरणागतीचे तहनामे सक्तीनं लिहून घ्यायला जपान्यांना एक ब्रिगेडपेक्षां जास्ती फौज मुळीं लागलीच नव्हती. आतां मात्र कित्येक महिने अगोदर "जिंकलेल्या" एका लहानशा प्रदेशांत "शांतता प्रस्थापित करायच्या कामीं" तीन ब्रिगेड्स लागूं लागल्या.

या मोहिमेमुळें गनिमांना पुन्हा माघार घेऊन मियाओ फेंग शान या पवित्र डोंगराचा आश्रय घ्यावा लागला. जपान्यांच्या गराड्यांतून निसटून

आलेले आणखी इतर सत्तावीस गनिमी गट देखील याच ठिकाणीं एकत्र झाले. या एकंदर गनिमांची संख्या ७००० झाली.

या डोंगराच्या उतारावरील झाडींत गनिमांना छान लपून बसतां येई. यामुळं जपानी तोफा व बॉंबर विमानांची सरबत्ती बहुतेक आडमापच चाले. कित्येक दिवसपर्यंत जपानी विमानांनीं या डोंगरावर एकामागून एक सतत हल्ले चढविले. शिखरावरील यात्रेचं पवित्र मंदीर त्यांनीं उध्वस्त केलं. बॉंबगोळ्यांच्या प्रचंड स्फोटांचे प्रतिध्वनि तीस मैल अंतरावर पीपिंग शहरांत ऐकूं जात होते. पण या बॉंबफेकींत एकही गनीम दगावला नाहीं.

पण पुढं जपान्यांनीं डोंगराला गराडा दिला. अन् या गराड्यांतून निसटून जातांना मात्र गनिमांची फार हानी झाली. त्यांतल्या त्यांत चाओ तुंगची तुकडी मात्र नशीबवान खरी. एका आडवाटेला जपानी फौजेचा बंदोबस्त ढिला आहे असं पाहून या तुकडीनं त्या बाजूनं काढता पाय घेतला. पण या तुकडीला सुद्धां अफूट निसटतां नाहीं आलं. सात विमानांनीं तिचा पाठलाग करून मशिनगन्सच्या माऱ्यानं तिचीं पन्नास माणसं ठार केलीं. इतर गनिमी गटांची हानी या मानानं फारच झाली. मांच्युरियन राष्ट्रीय सेनेंतला माजी रेजिमेंटल कमांडर चांग-हुंग याच्या हाताखालील हजार गनीम घाटांतल्या एका अरुंद वाटेनं जातां जातां जपान्यांच्या तावडींत सांपडले, व या चकमकींत पांचशें गनीम कापले गेले. उरलेल्यांची पांगापांग झाली. पुढं या तुकडींतील राहिलेसाहिले लोक चाओ तुंगच्या गटाला मिळाले. व तिचा पुढारी चांग हुंग हा या गटाचा "चीफ ऑफ स्टाफ" झाला. कुंग-चांग-हुई याची गनिमी तुकडी ५०० माणसांची होती, तींतले अवघे पन्नास गनीम निसटले व बाकीचे मारले गेले अगर कैद झाले. हे पन्नास लोक देखील चाओ तुंगलाच येऊन मिळाले. मियाओ फेंग शांग-वरून चाओ तुंगनं आपलं ठाणं हालविलं तेव्हां त्याच्या हाताखालीं १५०० गनीम जमा झाले.

ही तुकडी आपल्यावर ओढवलेल्या पहिल्या मोठ्या अग्निपरिक्षेतून सहा महिन्यांत बाहेर पडली न पडली तोंच तिच्यावर शेवटचं मोठं अंतर्गत अरिष्ट आलं. जपान-विरोधी प्रतिकाराचा मार्ग कठीण अन् दीर्घसूत्री. पेंढारीपणाचा मार्ग हमखास फायदेशीर, क्वचितच विशेष धोक्याचा. अन् पेंढारी टोळी जर तशीच महत्वाची व पुढाऱ्यांचं ऐकणारी असेल तर अशा पुढाऱ्याला जपान्यांकडून सेनापतिपद मिळण्याचं आमिष. आमच्या तुकडीनं तर प्रतिकाराचा विडा उचललेला. अशा परिस्थितींत या तुकडीं-तला एक बॅटॅलियन कमांडर ची त्सांग-वू या माजी पेंढाऱ्यानं पेंढारीपणाचा मार्ग पतकरला. त्यानं हें काम काळजीपूर्वक व धिमेपणानं चालविलं. व्यक्तिगत ताकदीच्या व धैर्याच्या कृती करून व पुष्कळशी आत्मप्रौढी मिरवून त्यानं स्वतःची इभ्रत वाढवून घेतली. विद्यार्थ्यांनीं चालविलेल्या राजकीय कार्यांत सर्व बाजूंनीं अडथळे आणून त्यानं असा बंदोबस्त करून ठेवला कीं जेणेकरून आपल्या हाताखालचे लोक आपल्या शब्दाला वेद-वाक्य मानतील व दुसऱ्या कुणाचंही ऐकणार नाहींत. विद्यार्थ्यांना गनीम सैनिकांपासून अलग ठेवायचा प्रयत्न त्यानं पदोपदीं केला. विद्यार्थी हे शरीरप्रकृतीनं नाजूक व हत्यार चालवण्यांत कच्चे; म्हणून त्यानं त्यांचा तिरस्कार चालविला व आपल्या अनुयायांना सुद्धां त्यांच्याबद्दल अशीच वृत्ती ठेवायला त्यानं उत्तेजन दिलं. या सगळ्या गोष्टींचा परिणाम काय होणार हें उघडच दिसत होतं.

विद्यार्थ्यांनीं चाओ–तुंगची भेट घेऊन ची ला काढून टाकण्याचा आग्रह धरला. त्यांनीं असं दाखवून दिलं कीं त्याला जर गटांत राहूं दिलं तर माजी पेंढारी असलेले जे सैनिक आज जपान–विरोधी लढ्यांत भाग घेऊं शकतील ते त्याला फितूर होऊन हातचे जातील. त्याच्या हाताखालचे लोक खेडोपाडीं एव्हांच अशा रीतीनें वागत आहेत कीं त्यामुळं गनिमांच्या सद्धेतूवरील जनतेचा विश्वास नष्ट होत चाललाय. 'ची' आतांशा अफू ओढतोय व आपल्या लाळघोट्यांना बरोबर घेऊन पेंढारी दलाच्या

नायकासारखा दिमाखांत मिरवतो. शेतकऱ्यांना त्याच्याबद्दल धास्ती वाटूं लागली आहे. त्याच्यासारखे लोक काय करतात याचा त्यांना अनुभव आहे.

विद्यार्थ्यांच्या या तक्रारीची हकीकत ची-त्सांग-वूच्या कानावर गेली. आपण एका नव्या धर्तीच्या सैन्यांत आहोंत हें त्याच्या लक्षांतच आलं नाहीं. त्यानं सरळ आपल्या बटॅलियनमधल्या विद्यार्थ्यांना बोलावून घेऊन त्यांना फर्मावलं कीं "चीच्या बटॅलियन मधील आम्हीं विद्यार्थी व राजकीय कार्यकर्ते हे आमचं नेतृत्व ची कडेच राहिलं पाहिजे अशी मागणी करीत आहोंत असा अर्ज करुन त्यावर सह्या करून द्या." विद्यार्थ्यांनीं हा हुकूम धुडकावून लावला. तो भयंकर संतापला. "मी तुमचा कमांडर आहें. मी तुम्हाला या अर्जावर सह्या करायचा हुकूम देतोय," असं म्हणूं लागला तरी त्यांनीं सह्या न करतां त्याला काढून टाकायचा हट्ट धरला. याचा परिणाम असा झाला कीं ची ला दुसरं काम देण्यांत आलं.

मग ची नं निराळाच डाव रचला. माजी युद्धदेवांच्या फौजांतून नोकरी केलेले कांहीं लोक या पलटणींत कमांडर्स होते. त्यांची एक संघटना करून ची नं तिला "पॉवर पार्टी" असं नाव दिलं. या अधिकाऱ्यांनीं आपापल्या हाता-खालच्या लोकांसाठीं व्यक्तिगत स्वामिनिष्ठा व दहशतवादी शिस्त या जुनाट दुष्ट प्रथा पुन्हा प्रचारांत आणायचे प्रयत्न चालविले. पलटणीच्या अधिकारी मंडळांत या "पार्टीचे" लोक या निमुकल्या फौजेची "पॉवर" वाढवायचा एकसारखा आग्रह धरूं लागले. ते म्हणत : "आम्हाला जास्त तोफा-बंदुका पाहिजेत, जास्त माणसं पाहिजेत, जास्त पैसे पाहिजेत. पीपिंग-मधील आपल्या सहाय्यकांकडून आपण जास्त मदत मागितली पाहिजे. खेड्यापाड्यांतील लोकांकडून आपण सक्तीनं वसूली केली पाहिजे." त्यांना सर्वांत जास्त चीड येई राजकीय कार्यकर्त्यांची. ते सांगत: 'अहो, सैनिकानं जर हुकूम मोडला तर आम्ही त्याला मार देतों. मार मिळाला म्हणजे तो जास्त चांगला लढतो. शत्रू पुढ आला म्हणजे आम्ही त्याला गोळी घालतों. लष्करानं हेंच करायचं असतं. या कामीं तुमच्या भाषणाचा काय

उपयोग ? हे विद्यार्थी लेकाचे आमची पॉवर कमी करून आमच्या प्रगतीला अडथळा मात्र करतात."

विद्यार्थ्यांनीं जेव्हां पॉवर पार्टीचा जोर वाढतोसं पाहिलं तेव्हां त्यांनीं तिचं वजन नाहींसं करण्यासाठीं जास्त जोरानं खटपट चालविली. त्यांनी स्वत: लष्करी कवाईत करून व लढ्यांत प्रत्यक्ष भाग घेऊन गनिमांची अशी खात्री करून दिली कीं आपण नुसते बोलूकाका नसून लढवय्ये देखील आहोंत. शत्रूंशी चाललेल्या चकमकींत विद्यार्थ्यांनीं विशेष मर्दुमकी गाजवायची उमेद धरली. त्यांना हें कळून चुकलं कीं या ब्रढाईखोर भावी युद्धदेवांना बाजूला फेंकायचं असेल तर आपण गनिमांच्या मनांत नुसती सहानुभूति जागृत करण्यावर न थांबतां त्यांचा विश्वासही संपादन केला पाहिजे. अन् या खट-पटींत त्यांना यश मिळालं.

शेवटीं जेव्हां या "पॉवर पार्टी"नं सगळी पलटण ताब्यांत घेऊन तिचं रूपांतर पेंढारी दलांत करावयाचा घाट घातला तेव्हां तिला असं आढळून आलं कीं आपल्याला कुणाचाच पाठिंबा नाहीं. ची त्सांग-वू याला गोळी घालून ठार करण्यांत आलं. त्याच्या अनेक अनुयायांची हत्यारं काढून घेऊन त्यांना पलटणींतून हांकलून देण्यांत आलं अन् अनेक विद्यार्थ्यांना बढती देऊन कमांडर्स करण्यांत आलं.

गेलीं अनेक वर्षं युद्धदेवांनीं जनतेची चळवळ दडपून टाकलेली होती. युद्धदेवांच्या मनोभूमिकेचे अवशेष हे जपानची बाजू घेऊन बंडखोर जन-तेशीं लढूं लागले. पण उत्तर चीनमधील गनिमी चळवळीनं ही कीड सहज मारून टाकली. युद्धदेवांचा जमानाच संपला.

मग आमची ही पलटण माघार घेत नानकाऊच्या खिंडीपर्यंत आली. चीनची महान संरक्षक तटबंदी याच खिंडीलगत पीपिंगच्या अगदीं नजीक येते. या ठिकाणीं ऑगस्ट अखेरीस एक मोठी लढाई झालेली होती. तींत उध्वस्त झालेल्या खेड्यापाड्यांतील वस्तीवर आतां पेंढाऱ्यांची एक टोळी जपान्यांच्या मदतीनं दहशत बसवून राहिलेली होती. आमच्या पलटणीनं या

पेंढाऱ्यांवर हल्ला करून त्यांची दाणादाण केली व दोन मशिनगन्स अन् अनेक रायफली जिंकून घेतल्या. खेडुतांनीं या उपकारांची फेड लगोलग केली. त्यांनीं गनिमांना खाऊंपिऊ घालून त्यांच्या जखमी सैनिकांचा संभाळ केला.

चाओ तुंगची ही १५०० गनिमांची पलटण आतां पीपिंगच्या पंचक्रोशींतील सर्वांत मोठी पलटण ठरली. पण एकंदर होपे प्रांतांत मात्र तिचा नंबर खालींच होता. इकडे निदान २०,००० गनिमांनीं जपानी आक्रमकांवर हत्यार उपसलेलं होतं. याच्या आधीं असेच लहान लहान गट एकत्र होउन त्यांचे मोठे गट झाले. मोठ्या गटांनीं परस्परांशीं संबंध जोडून "संयुक्त पलटणी" तयार केल्या. "होपे-प्रांतीय जनतेची आत्मरक्षण सेना" ही लू चेंग त्साओ (हाही मांच्युरियनच होता) याच्या नेतृवाखालीं मध्यभागांतील अनेक जिल्ह्यांवर अंमल गाजवून राहिलेली होती. तींत सरकारचे व राष्ट्रीयदलाचे माजी सैनिक, रेल्वेकामगार व शेतकरी, यांचा विशेष भरणा होता. दक्षिण भागांतील तामिंग या गांवीं १००० लोकांचा एक गनिमी गट तयार झालेला होता. या गटासोबत २०० विद्यार्थ्यांचं राजकीय दल जनतेंत प्रचार चालवीत होतं. होपे–होनान सरहद्दीवर त्सेहसिएन या ठिकाणीं ४००० गनिमी सैनिकांनीं एका सबंध जिल्ह्याचा कारभार चालविलेला होता. ताइहांग पर्वताच्या रांगेंतील डोंगरी प्रदेशांत, होपे, होनान व शान्सी यांच्या तिहेरी सरहद्दीवर, डॉ. हसियु–लिंग यानं एक नवंच गनिमी टाणं स्थापन केलं होतं. हा गृहस्थ टिन्टसिन येथील एका इंजिनियरिंग कॉलेजांतील निरुपद्रवी शिक्षक. पण त्याचं हें गनिमी दल सतत अठरा महिने शत्रूला "त्राही भगवान" करून राहिलं होतं. शान्सी प्रांताच्या ईशान्य भागांत आठव्या पलटणीच्या बिनीवाल्यांनीं शान्सी–चाहार–होपे सरहद्द-प्रदेशीय लष्करी शाखा–सरकारची राजवट सुरूही केली होती. या प्रांताच्या सुपीक अंतर्वेदींतील लू चेंग त्साओ याच्या पलटणींशीं या बिनीवाल्यांनी अगोदरपासूनच सहकार्य चालू केलं होतं. लूच्या पलटणीनीं पीपिंग–हांकाऊ

रेल्वे लाइन अडवून ठेवलेली होती. इकडे पीपिंग व टीन्टसिन या शहरांतून काम करणाऱ्या उत्तर चीनप्रांतीय राष्ट्रीय स्वातंत्र्य संघानं आपली पुनर्घटना करून त्याला उत्तर चीन प्रांतीय जनतेच्या जपानविरोधी आत्मरक्षण कमिटीचं रूप दिलं होतं. ता. १० नोव्हेंबर रोजीं या कमिटीनं टीन्टसिन शहरीं आपली एक सभा घेतली. या सभेला अनेक गनिमी गटांचे प्रतिनिधी हजर राहिले. पुढं लवकरच या कमिटीचे प्रतिनिधी हांकाऊ शहरीं मध्यवर्ती सरकारच्या भेटीला गेले व त्यांनीं आपल्या कामगिरीचा अहवाल सरकारला सादर करून सरकारची मान्यता व मदत मागितली.

होपे प्रांतांतील "जिंकलेल्या" प्रदेशाचं चित्र हें असं होतं. जपान-छाप शांतता व रामराज्य घेऊन आलेल्या पाहुण्यांच्या स्वागताची सिद्धता करायला या प्रांतांतल्या जनतेला फक्त तीनच महिन्यांचा अवधी मिळालेला होता. तेवढ्यांत तिनं इतकी कामगिरी केली.

नोव्हेंबर अखेरीला नानकाऊ नजीकच्या घाटांतील चाओ–तुंगच्या ठाण्यावर एक जासूद आला. त्यानं आपल्या बरोबर कॉम्रेड च्यु टेह व कॉम्रेड पेंग टेह हुआई यांचं पत्र आणलं होतं. हे दोघे माजी लाल सेनेचे म्हणजे आतां राष्ट्रीय सरकारच्या नेतृत्वाखालील आठव्या चिनी पलटणीचे सरसेनापती व उपसेनापती होते. त्यांनीं चाओला लिहिलं : "तुमच्या पलटणीचा पराक्रम आमच्या कानीं आलेला आहे. आपल्याला शत्रूविरुद्ध जास्त परिणामकारक लढा करायचा आहे. त्यासाठीं आपण सर्वांनीं आठव्या पलटणीचं मुख्य दल व गनिमी दल यांच्याशीं सहकार्य करून एकसूत्री मोहीम केली पाहिजे. तुम्ही या कार्याला संमती द्याल अशी आम्हीं आशा करतों."

ता. १० डिसेंबर रोजीं आमच्या पलटणीनं, फू चिया ताई या गांवी एक परिषद भरविली. तींत असं ठरलं कीं पश्चिम दिशेनं कूच करायचं व वूताईशान पर्वताकडे जायचं–हा पर्वत म्हणजे चिनी बौद्धमताचं पवित्र क्षेत्र; "पांच पवित्र पर्वत" असं त्याचं नांव, होपे व शान्सी या प्रांतांच्या सरहद्दीवर हा पर्वत खडा उभा आहे. हिंवाळ्याचे दिवस. आमच्या गनिमांना

निवाऱ्याचं ठाणं हवं होतं. चाओ तुंग पूर्वी पांच पर्वतांवर जाऊन आलेला होता. व या पर्वतांच्या पायथ्याशीं जें जिल्ह्याचं ठिकाण होतं तिथल्या मॅजिस्ट्रेटची व त्याची ओळख होती. शिवाय या मंडळींची अशी अपेक्षा होती कीं तिथं मुक्काम करून राहिलेल्या राष्ट्रीय सेनेला आपण जाऊन मिळूं. आदल्या सप्टेंबर–ऑक्टोबरांत आठव्या पलटणीचं हें मुख्य ठाणंच होतं. पुढं आठवी पलटण दक्षिण शान्सी प्रांताकडे गेली आणि तिच्यापैकीं लिन पियावच्या सुप्रसिद्ध ११५ व्या डिव्हिजनचा एक भाग मागें राहिला.

पण आमची पलटण वू ताई शान पर्यंत पोंचायच्या पुष्कळ अगोदर वाटेंतच तिला आठवी पलटण भेटली. चीनची महान तटबंदी ओलांडून चाहार प्रांतांत शिरल्यावर तिला असं आढळून आलं कीं यूहसियेन, लाइवांग व कानलिन हे तीन जिल्हे आठव्या पलटणीच्या एका रेजिमेंटनं ताब्यांत घेतले आहेत. या रेजिमेंटचा कमांडर चांग–त्रियेन–वू यानं या मंडळींना पश्चिम होपे प्रांतांतील फूपिंग या गांवीं पाठवलं. तिथं सगळ्या प्रांतांतल्या गनिमी तुकड्या एकत्र होऊन एकजुटीनं कार्य करायच्या वाटाघाटी करणार होत्या.

शान्सी–चाहार–होपे सरहद्द प्रदेशीय लष्करी शाखेचा कमांडर नियेह युंग-चान हा या मंडळींना फूपिंग मुक्कामीं भेटला. नियेह हा फार हुषार माणूस. चिनी स्वातंत्र्य लढ्याचा त्याला पुष्कळ अनुभव. त्याचं शिक्षण फ्रान्स, जर्मनी व रशिया या देशांत झालेलं. १९२६ सालीं तो चीनच्या प्रख्यात व्हाम्पोआ लष्करी कॉलेजांतील राजकीय शाखेचा सेक्रेटरी होता. १९२५–२७ च्या क्रांतिकारक मोहिमांचे लष्करी अधिकारी याच कॉलेजांत शिकून तयार झालेले. पुढं चिनी कम्युनिस्ट पार्टी व कुओमिन्टांग यांची एकजूट मोडल्यानंतर नियेहनं कियांगसी प्रांतांतील सोवियत सरकारची व लाल सेनेची सेवा केली. आतां दोन्ही पक्षांची पुन्हा एकजूट झाली, तेव्हां शत्रूच्या ताब्यांत गेलेल्या प्रदेशांतील जनतेला आक्रमकांविरुद्ध उठवायची कामगिरी मध्यवर्ती सरकारनं त्याच्यावर सोंपविली.

आमच्या पलटणीनं फूपिंग गांवीं मुक्काम करून शिक्षण घ्यायचं ठरवलं. ही मंडळी तिथं महिनाभर राहिली. लष्करी व राजकीय शिक्षणाच्या सर्वमान्य

पद्धतींचा त्यांनीं अभ्यास केला. लष्करी शिक्षणांत शारीरिक सहनशक्ति वाढविण्यावर, त्याच बरोबर रात्रीची लढाई करणं व तडकाफडकी हल्ला करणं या गोष्टींवर विशेष भर देण्यांत आलेला होता. राजकीय शिक्षणाबरोबरच या मंडळींना सर्वसाधारण शिक्षणही मिळालं. कारण यांतले बहुतेक निरक्षर होते. हें सर्वसाधारण शिक्षण संयुक्त राष्ट्रीय एकजुटीच्या कार्यक्रमानुसार देण्यांत आलं. त्यांत स्वयं-शिस्त व जनतेशीं अत्यंत निकटचा संबंध ठेवायची आवश्यकता या दोन गोष्टींवर विशेष जोर देण्यांत आलेला होता.

शिक्षणाचा रोजचा कार्यक्रम असा : न्याहारीच्या आधीं दीडतास धावणं व डोंगर चढणं. न्याहारीनंतर लष्करी डाव-पेंचांचं शिक्षण एक तास व राजकीय शिक्षण एक तास. मग भोजन. भोजनोत्तर थोडी विश्रांती आणि नंतर संध्याकाळपर्यंत अनेक तास हत्यारी कवाईत. संध्याकाळीं व्याख्यानं, नाट्यप्रयोग व सामुदायिक गायन. फूपिंग शहरीं व त्याच्या आसपासच्या ठिकाणीं केंद्रित झालेल्या सर्व गनिमी गटांनीं या कार्यक्रमानुसार शिक्षण घेतलं.

निरनिराळ्या लष्करी लोकांसाठीं पगारांचं स्केल पुढीलप्रमाणं अंमलांत आणायचं ठरलं:—

| | | |
|---|---|---|
| पलटणीचा कमांडर | दरमहा | ६ डॉलर. |
| रेजिमेंटचा कमांडर | ,, | ४ डॉलर. |
| यांच्याहून खालचे हुद्देदार | ,, | ३ डॉलर. |
| साधे सैनिक | ,, | २ डॉलर. |

बढती द्यायची ती प्रत्यक्ष युद्धांत आलेला अनुभव व दाखविलेलं कर्तृत्व यांचा विचार करून दिली जाई. पण ती पायरी पायरीनंच दिली जाई असं मात्र नव्हे. सामान्य गनिमी सैनिकानं सुद्धां जर एखाद्या लढाईत विशेष मर्दुमकी गाजविली तर त्याला एकदम कंपनी कमांडरची सुद्धां जागा मिळे. त्याचप्रमाणं एखाद्या कमांडरनं जर आपली जबाबदारी पार पाडायच्या कामीं कसूर केली तर त्याला बेलाशक खाली ओढून सामान्य सैनिकाचं काम दिलं जाई. पण अशा बदल्या भरमसाट केल्या जात नसत. त्या त्या गटां-

तील लष्करी व राजकीय पुढाऱ्यांचा संयुक्त निर्णय घेतल्यावरच त्यांची अंमलबजावणी होई.

लष्करी डावपेचांचं शिक्षण हें प्रत्यक्ष कवाइतीनिशीं व वर्गातल्या वालुका–प्रयोग–पेटिकेंतील "छोट्या" लढायांच्या प्रात्यक्षिकांनिशीं दिलं जाई. गनिमांना या वालुकापेटिकेंतील लढाईची मोठी मौज वाटे. क्लास सुटल्यावर या प्रायोगिक मैदानावर एकमेकांच्या सोंगट्यांची हालवाहालव करीत, परस्परांच्या बगलांवर हल्ले चढवीत अगर 'लष्कराचा' धुव्वा उडवीत, ते तासचे तास घालवीत असत. प्रत्येक लढाईनंतर तिच्या हालचालींची चर्चा करून त्यांचं पृथःकरण करायचं शिक्षण सर्व सैनिकांनां दिलं जाई. यापुढं प्रत्येक चकमक झाली कीं आमचे गनीम तिच्यांतील प्रत्येक मुद्याचा विचार करूं लागले व पराभवाचीं व विजयाचीं कारणं शोधूं लागले.

आजपावेतों " जपानविरोधी जनतेची पहिली संयुक्त पलटण " ही जपानशीं लढूं इच्छिणारी एक भुरटी टोळी होती व भटकत भटकतच ती आपलं संख्याबळ व शस्त्रबळ वाढवून राहिलेली होती. आतां मात्र जपान–विरोधी लढ्याला निश्चितपणानं वाहून घेतलेल्या दीड हजार शस्त्रसज्ज सैनिकांच्या या पलटणीपुढं अनेक नवनवे प्रश्न उभे राहिले. टेक्निकल व राजकीय प्रश्न एकमेकांशीं निगडित झालेले, दीड हजार सैनिकांनां हालचाली जिथून करतां येतील अशी छावणी पाहिजे. अशी छावणी कीं जिथं रसद गोळा करतां येईल, जिथं नव्या सैनिकांची भरती करतां येईल. या छावणीच्या रक्षणाचीहि तरतूद व्हायलाच हवी. अशा छावणीचा योगक्षेम कसा चालवायचा ? एखादं पेंढारी दल अगर जुन्या युद्धदेवांचं लष्कर जनतेचं रक्तशोषण करीत होतं तसं करून ? का जनतेशीं सर्वस्वी एकजीव होऊन–आणि खून, लुटालूट व बलात्कार असे अनाचार करणाऱ्या अत्यंत क्रूर जपानी लुटारूनीं चिनी खेड्यापाड्यांतून जो हाःहाःकार माजविलेला होता त्याचा प्रतिकार करणाऱ्या जनतेचं सशस्त्र अग्रगामी दल होऊन ? आणखी एक प्रश्न म्हणजे चढाईच्या हालचालींचा. दरेक गनिमी गटानं अलग

अलग रीतीनं शत्रूच्या बगलांवर हल्ले चालू ठेवावेत, का सर्वांनी मिळून एकजुटीनं हल्ला करून जपान्यांचे दळणवळणांचे मार्ग तोडावेत, व अशा प्रकारानं मुख्य युद्धाच्या आघाडीवर निकडीची जरूर असलेल्या जपानी फौजांना पिछाडीकडेच अडकावून ठेवावं ?

चाओ-तुंगची तुकडी व इतर गनिमी तुकड्या फूपिंगला आल्यावर त्यांना या सगळ्या प्रश्नांचीं सरळ व समंजस उत्तरं सांपडलीं. त्यांच्यापुढं कुणी उगाच मोघम शब्दांची व्याख्यानबाजी मुळीं केलीच नाहीं. आठव्या पलटणीनं आपल्या अनेक मोहिमांतून तावून सलाखून निघालेला गनिमी युद्धाचा व लोकसंघटनेचा प्रत्यक्ष अनुभवच या मंडळींना सादर केला. अवघ्या दोन महिन्यांच्या अल्पावधींत पश्चिम होपे प्रांतातील मुक्कामांत आठव्या पलटणीनं इकडील जनता व शस्त्रसज्ज सेना या दोहोंत जिवा-भावाचे अभेद्य संबंध कसे जोडले आणि कसलीहि जबरदस्ती न करतां केवळ संघटना व सहकार्य यांच्या जोरावर मोठमोठ्या पलटणीसाठीं नवे रिक्रूट, युद्धसाहित्य व खाद्यपदार्थ यांचा पुरवठा जनतेकडून मिळत राहील असा बंदोबस्त तिनं कसा केला हें सगळं या मंडळींनीं प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहून घेतलं. फूपिंगहून दक्षिण शान्सी प्रांतांतील आठव्या पल-टणीच्या मुख्य छावणीशीं रेडिओवरून बोलणं चाले; तसंच शान्सी येथील मुख्य सरकारी लष्करी अधिकाऱ्यांशीं व हांकाऊ येथील मध्यवर्ती सर-कारच्या युद्धकचेरीशींहि येथून बोलणं चाले. म्हणून गनिमांच्या लष्करी हालचालींत एकसूत्रीपणा आणणं फूपिंग शहरीं अगदीं शक्य होतं.

नियेह युंग-चेन व फूपिंग शहरीं जमा झालेले अनेक गनिमी पुढारी यांच्या दरम्यान संयुक्त राष्ट्रीय एकजुटीची व्यवस्था लगोलग करण्यांत आली. जपानी फौजांच्या पिछाडीकडील जो जो मुलूख गनिमी दलांनीं परत जिंकून घेतलेला होता त्याचा मुलकी राज्यकारभार ताबडतोब मध्य-वर्ती सरकारचे प्रतिनिधी " शान्सी-चाहार-होपे-प्रांतीय सरहद्द सरकार " यांच्या ताब्यांत द्यायचं ठरलं. गनिमी दलांनां विशिष्ट प्रदेश, संरक्षणार्थ व

चळवळ करायसाठीं वांटून देण्यांत आले. सर्वसाधारण मुलकी व लष्करी धोरणाच्या बाबतींत " सरहद्द सरकारचं " म्हणणं त्यांनी अमलांत आणायचं आणि स्थानिक प्रश्न व आपल्या दलांचा अंतर्गत कारभार या बाबतींत मात्र त्यांना पुष्कळशी स्वायत्तता असायची असं ठरलं.

अशी परिस्थिति होती १९३७ च्या डिसेंबरांत—म्हणजे युद्ध सुरू झाल्यानंतर सहा महिन्यांनीं. अन् कोणत्या प्रदेशांत ? तर ज्यावर वृत्तपत्रीय नकाशांतून "जपानच्या ताब्यांतील मुलूख" असा ठळक मथळा छापला जात होता त्या प्रदेशांत.

ता. १५ जानेवारी १९३८ रोजीं मध्यवर्ती सरकारच्या खास मंजुरीनुसार वूताईशान या ठिकाणीं सरहद्दप्रदेशीय राज्यकारभार रीतसर सुरू करण्यांत आला. त्यावेळीं जपानी फौजांच्या पिछाडीकडील बेचाळीस जिल्हे या सरकारच्या अंमलाखालीं होते. अन् या सरकारचं लष्कर तीन प्रांतांतील गनिमी दलं मिळून एक लाख होतं.

या नंतर लवकरच चाओ–तुंगच्या पलटणीनं पश्चिम होपे प्रांतांतील आठ जिल्ह्यांचा बंदोबस्त करायच्या कामगिरीसाठीं कूच केलं. तिला आतां "सरहद्दीवरील लष्करी प्रदेशांतील पांचवी शाखा पलटण" असं नांव मिळालेलं होतं. तिचं मनुष्यबळ आतां दसपटीनं वाढून दहा हजारांवर गेलं. तिच्यांत नवीन दाखल झालेले लोक बहुतेक सगळे शेतकरी व कामकरीच होते अन् आपल्या घरादारांच्या व जमीनजुमल्याच्या संरक्षणार्थ ते लढत होते.

आमच्या या पलटणीनं पुढं बराचसा मुलूख शत्रूकडून परत जिंकून घेतला अन् अनेक लढाया मारल्या. ता. ७ जुलै १९३८ रोजीं म्हणजे चिनी-जपानी युद्धाच्या प्रथम वार्षिक दिनादिवशीं आमच्या पलटणीनं १००० गनीम पीपिंग शहरावर चाल करून पाठविले. या तुकडीनं मार्को पोलो पूल परत जिंकून घेऊन तो एक दिवसभर आपल्या ताब्यांत ठेवला. शहराच्या इलेक्ट्रिक पॉवर हाऊसवर धाडशी छापा घालून तिनं पीपिंग शहरांत अंधार–गुडुप करून ठेवला. तिच्या प्रतिकारार्थ शहराच्या रस्तोरस्तीं वाळूच्या पोत्यांचे तट उभारण्यांत आले. बरोबर एक वर्षापूर्वी जसा प्रकार झाला

त्याचप्रमाणं जपान्यांनी शहरांत लष्करी कायदा जारी करून रस्त्यांवर सैनिकांची परेड चालू केली व तोफांचा धूमधडाका चालू ठेवला. पण आतां बचावाची भूमिका आक्रमकांना घ्यावी लागलेली होती. आपलं कार्य उरकल्यानंतर आमच्या तुकडीनं माघार घेतली. पीपिंगवरील हा छापा म्हणजे एक राजकीय निदर्शन होतं. "शत्रूला धाडशी तडाखे लगावून युद्धाचा वार्षिक दिन साजरा करायचा" असा ठराव सरहद्द सरकारनं केलेला होता, व त्याची ही अंमलबजावणी होती. "उत्तरचीन अजून आमचाच आहे" असा संदेश या कृतीनं जपान्यांना, पीपिंगच्या जनतेला, परकीय वकिलातींना व अवघ्या जगाला ऐकविला. जपान्याचा तर संतापानं अन् चिडीनं थरकांप उडाला. ही सतावणूक संपायची तरी केव्हां ? पीपिंगच्या जनतेला नवी आशा वाटूं लागली. परकीय वकिलातींतून रेडियोसंदेश वणघणूं लागले.

पण हें सगळं पुढं व्हायचं होतं. आतां कुठं आमच्या पलटणीनं आपल्या कारकीर्दीतल्या नव्या मन्वंतराला सुरवात केलेली होती.

दरेक चकमकीनंतर जिच्यांत आमूलाग्र उलथापालथी व्हाव्यात अशी वैचित्र्यपूर्ण गनिमी तुकडीची अवस्था आतां इतिहासजमा झालेली होती. पीपिंग शहरालगतच्या डोंगरांतून जपान्यांचा निषेध करीत भटकणारी टोळी अशी आमच्या पलटणीची पहिली अवस्था होती. आणि आतां पद्धतशीर लष्करी, राजकीय व आर्थिक योजना आंखून तदनुसार जपानविरोधी प्रतिहल्ल्याची तयारी करायसाठीं नव्या सरहद्द प्रदेशांतून छावण्या उभारून त्यांचं पद्धतशीर संरक्षण करायचं काम चालू होतं. या दोन अवस्थांच्या दरम्यान एक सबंध ऐतिहासिक कालखंड उभा होता. अन् हें सगळं स्थित्यंतर अवघ्या सहा महिन्यांत झालं. या सहा महिन्यांत उत्तर चीनच्या बहादूर जनतेनं अनेक लढवय्यांना जन्म दिला.

चिनी जनता आतां पलटणींना जन्म द्यायला लागलेली होती.

चाओ-तुंगची पलटण ही यांतली अवघी एक पलटण होती.

* * *

पण आमच्या गनिमी पलटणीची आई बुढ्ढी चाऊ-माई हिचं पुढं काय झालं हें सांगायचं राहूनच गेलं की ! ती पुढं दक्षिण होनान प्रांतांतील

१९१५८



पीपिंग–हांकौ–रेल्वे लाइनवरील एका उंच डोंगरी ठिकाणीं गेली. तिथं सुद्धां ती स्वस्थ मुळींच राहिली नाहीं. दोन मांच्युरियन गनीम, आपला नवरा व आपल्या दोघी मुली यांच्या मदतीनं तिनं पीत (व्हांगहो) नदीच्या उत्तर तीरावर एक नवी गनिमी छावणी उभारायची खटपट चालविली. त्यावेळीं या ठिकाणीं शत्रूची चढाई सुरू होणार होती. चार हजार "लाल भाले" इथं जमा झाले व वीहवी या ठिकाणी त्यांची मुख्य छावणी स्थापन झाली. या गनिमी फौजेनं शत्रूला कित्येक चकमकींत माती चारली, पण पुढं संघटना व पुढारीपण यांच्या अभावीं तिची पांगापांग झाली. १९३८ सालाच्या सुरवातीपासून आमची बुढ्ढी चाऊ–माई चीन देशभर प्रवास करीत असून उत्तर चीन मधील गनिमांच्या मदतीसाठीं फंड जमवीत असते.

---


लढाईला ताकद लागते.

आणि ताकदीला सकस व योग्य अन्न पाहिजे.

योग्य व सकस अन्नाची घरगुती सोय नसल्यास आपण—

बी. तांबे लिमिटेड

( पूर्वीचें तांबे आरोग्य भुवन )

या कंपनीचे मालकीच्या उपाहारगृहांत या.

( १ ) शेउ

( २ ) मा

( ३ ) को REFBK-0019158 या जवळ.

( ४ ) इन्कमटॅक्स ऑफीस, क्वीन्स रोड.

( ५ ) रिझर्व बँक, फोर्ट.

ऑफीस— संझगिरी सदन, गिरगांव. फोन २०६८०.

....दृष्टी मुळेंच सृष्टि....

सर्वांच्या खात्रीचे आणि विश्वासू

आर्. एन्. शिंदे ॲन्ड सन्स.




आर. एन्. शिंदे ॲण्ड संन्स्

यांच्या येथें डोळ्यांच्या तज्ञ डॉक्टरांकडून
डोळे मोफत तपासून घ्या

—उत्तम माल व माफक दर—

( १ ) २०७ गिरगांव रोड, मुंबई नं. ४.
( २ ) चामारबाग, पोयबावडी मुंबई नं. १२.
( ३ ) रानडे रोड, दादर, मुंबई नं. १४.

मुद्रक :-शंकर विठ्ठल लेले, दी प्राज्ञप्रेस, ३१५ गंगापुरी, वाई.
प्रकाशक :-मधुकर गणेश गुहागरकर, घ. नं. १८८ खोली नं. १८६,
फणसवाडी मुंबई. नं. २

# दुष्काळ !!!

## रडून रडून पृथ्वीच्या डोळ्यांचं पाणी देखील आटलं—

### अशा अवस्थेंत मंगळवेढ्याची माणुसकी राखणारा




निर्माते—बाबुराव पेंढारकर दिग्दर्शक—भाल. जी. पेंढारकर

## स्वस्तिक पाथे मध्यें ६ वा आठवडा.

रोज ३॥, ६॥, ९॥ शनि—रवि जादा खेळ १ वा.

' सिल्व्हर स्क्रीन एक्स्चेंज प्रकाशन '